Time : 2½ Hours

MARATHI (F.L.)

Subject Code

S 1 1 2

Total No. of Questions : 10 (Printed Pages : 8) Maximum Marks : 80

*सूचना : i) प्रत्येक प्रश्नांचे उत्तर **नवीन** पानावर लिहा.*

*ii) प्रश्नांचा क्रमांक व उपक्रमांक **स्पष्ट** लिहा.*

*iii) **सर्व** प्रश्न सोडविणे **आवश्यक** आहे.*

*iv) उजवीकडील अंक **गुण** दर्शवितात.*

1. अ) 'अ' स्तंभातील पाठांची नावे व 'ब' स्तंभातील लेखकांची नावे यांच्या योग्य जोड्या जुळवून लिहा : **[2]**

| 'अ' स्तंभ | 'ब' स्तंभ |
|---|---|
| (1) विज्ञान संशोधनातील उत्तेजना | (1) वि.स.खांडेकर |
| (2) कस्तुरीमृग | (2) द.त्ता. भोसले |
| | (3) जयंत नारळीकर |
| | (4) इंदुमती जोंधळे |

ब) पुढील दिलेल्या विधानांशी संबंधित असे प्रत्येकी **चार** पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी योग्य पर्याय निवडून ते विधान पूर्ण करून लिहा : **[2]**

i) पाठानुसार ग्रंथसंग्राहालय हे _____________.

अ) समृद्धीचे प्रदर्शन होय

ब) अभिरुचीचे प्रदर्शन होय

क) वाङ्मयाचे प्रदर्शन होय

ड) वैभवाचे प्रदर्शन होय

ii) 'मीच तुमचा बाजीराव' या बाजीराव बल्लाळलिखित पत्राचा प्रकार

अ) सांत्वनपर पत्र आहे

ब) आभार पत्र आहे

क) तक्रार पत्र आहे

ड) अभिनंदन पत्र आहे

क) पुढीलपैकी कोणत्याही **तीन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा : **[3]**

i) 'विषय गेले पळून' या कथेतील मुलाला शाळेचा कंटाळा का आला होता ?

ii) निश्चल अवस्था सिद्धान्ताचा कोणता दावा होता ?

iii) लोकमान्य टिळकांनी कोणत्या वृत्तपत्रांतून आपले विचार लोकापर्यंत पोहोचवले ?

iv) बाजीराव रेठरेकर आणि भिंवरावांचे नाते कोणते ?

2. पुढीलपैकी कोणत्याही **एका** वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा : **[3]**

i) ऐसा शक्तीयुक्त तो परमेश्वरू ।।

ii) माझ्या आज्याच्या पणज्याचा खापरपणजा असा धावता धावताच मेला.

iii) वाटायचे दोन रूपयांच्या चप्पलेने टोचण्याशिवाय करावे तरी काय ?

3. पुढीलपैकी कोणत्याही **तीन** उपप्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **पाच** ते **सहा** वाक्यांत लिहा : **[9]**

i) चिमण्या कशामुळे कमी झाल्या, असे लेखकांना वाटते ?

ii) छात्रालयातील पाटी व पुस्तकांविषयी लेखकांनी आपले कोणते अनुभव सांगितले आहे ?

iii) ग्रामरचनेचे विविध घटक आणि त्यांना हातभार लावणारे फिरस्ती यांचे वर्णन लेखकांनी कसे केले आहे ?

iv) स्त्रीचे अंत:करण केव्हा आणि कशाने सद्गद होते ?

4. अ) 'अ' स्तंभातील कवितांची **नावे** व ' ब' स्तंभातील कवींची **नावे** यांच्या योग्य जोड्या जुळवून लिहा : **[2]**

| **'अ' स्तंभ** | **'ब' स्तंभ** |
|---|---|
| 1) अभंगवाणी | 1) लहू कानडे |
| 2) नेमके निवडून घ्या ज्ञान | 2) संत तुकाराम |
| | 3) संत नामदेव |
| | 4) माधव जूलियन |

ब) पुढे दिलेल्या अपूर्ण विधानांशी संबंधित असे प्रत्येकी **चार** पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी अचूक पर्याय निवडून विधान पूर्ण करून लिहा : **[2]**

i) बाळकृष्ण अंगणात रांगत ___________.

अ) लोणी खात होता

ब) गोड हसत होता

क) गोपींना भुलवत होता

ड) गुलगुल बोलत होता

ii) देखणे खांदे स्वत:च्या इच्छेने

अ) स्वत:चा प्राण वाहून नेतात

ब) स्वत:चे ओझे वाहूत नेतात

क) स्वत:चा सूळ वाहून नेतात

ड) स्वत:चा जीव वाहून नेतात

क) पुढीलपैकी कोणत्याही **दोन** उपप्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा : **[2]**

i) कवी लेकरांना काय सांभाळण्याचा संदेश देत आहेत ?

ii) सभेमध्ये सत्पुरुष कोणत्या गुणामुळे ओळखला जातो ?

iii) वडील मुलाला कशाचा धनी करतात ?

iv) कवींच्या मते, हातांना देखणेपणा कशामुळे प्राप्त होतो ?

5. अ) पुढीलपैकी कोणत्याही **एका** अवतरणाचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा : **[3]**

   i) ''पोथी वाचून झोंपणें – स्मरुनि हे ओलावती लोचनें''

   ii) तुला रामराम घालत असतील अडलेले–नडलेले.

   ब) पुढीलपैकी कोणत्याही **दोन** उपप्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **पाच** ते सहा वाक्यांत लिहा : **[6]**

   i) संत एकनाथांनी विंचू या भारूडातून माणसाला कोणता बोध केला आहे ?

   ii) संत बहिणाबाई यांच्या मनातील विठ्ठलाविषयीची उत्कटभक्ती कशी व्यक्त झाली ?

   iii) अजून कोणकोणत्या गोष्टी शाबूत आहेत, असे कवींना वाटते ?

6. अ) पुढील उपप्रश्न सोडवा : **[2]**

   i) पुढीलपैकी कोणत्याही एका सामासिक शब्दाचा विग्रह करून त्या समासाचे नाव लिहा.

      अ) त्रिदेव

      ब) अंथरूण–पांघरूण

   ब) पुढील वाक्यातील **अधोरेखित** शब्दांच्या जाती ओळखून प्रकार लिहा : **[2]**

   त्या धावत्या <u>डौलदार</u> आकृती<u>कडे</u> सारे पशूपक्षी आश्चर्याने पाहू लागले.

   क) पुढीलपैकी कोणत्याही **दोन** वाक्प्रचारांचा अर्थ लिहून त्या वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग करून लिहा : **[4]**

   i) हृदय घट्ट करणे.

   ii) उपजीविका करणे.

   iii) आळा घालणे.

   iv) दु:खाचे परिमार्जन करणे.

7. अ) कंसातील सूचनेनूसार बदल करून लिहा : **[4]**

   i) लोकांना आनंद झाला. मी सर्वांना लावून घेऊन वागत होतो.
   (संयुक्त वाक्य करा)

   ii) मराठी भाषेस राज्यासनावरून दूर केलें आहे.दरबारांत तिला बंदी झाली आहे.
   (केवल वाक्य करा)

iii) संसकृत नाटकाच्या अस्ताबरोबरच विदूशक लोप पावला.
(वाक्य शुद्ध करून लिहा)

iv) छे मला खूप दिवसापास्नं ही नो मॅन्स लॅण्ड पाहायची होती
(योग्य विरामचिन्हांचा वापर करा)

ब) पुढीलपैकी कोणत्याही **एका** अलंकाराचे लक्षण व उदाहरण लिहा : **[2]**

i) अनुप्रास.

ii) उपमा.

8. अ) पुढील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :

बहुतेक माणासांच्या मनात सुखाबद्दल खोल अढी बसलेली असते. आपल्याला सुखी होण्याचा हक्क आहे – सामान्य माणसाला शोभेल अशा सामान्य पातळीवर सुखी होण्याचा हक्क आहे. ही गोष्ट आपण आपल्याशीच मान्य करीत नाही, काही अंशी त्याला आपला अहंकारही जबाबदार असतो. आपण सामान्य आहोत, ही कल्पना मान्य करणे आपल्या जीवावर येते प्रतिकूल परिस्थितीने अगतिक झालेल्या एखाद्या नेपोलियनच्या किंवा वायरनच्या भूमिकेत तो स्वत:ला पाहत असतो,! मन प्रसन्न करणारे घर, शरीराला गुदगुल्या करणारे कपडे, जिभेशी लघळपणा करणारे अन्न या गोष्टींना महापुरुषांनी गौणत्व दिले तर तो त्यांच्या खुशीचा सौदा आहे. पण सामान्य माणसाने आपल्या सुखाच्या कल्पनेत त्यांना अग्रहक्क दिला पाहिजे. महापुरुष कोणताही संदेश देवोत, सामान्य माणसाने एवाढीच घोषणा करावी.‘सुखी होणे हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि तो मी मिळवणारच!’

**प्रश्न :**

i) सामान्य माणूस कोणती गोष्ट आपल्याशीच मान्य करीत नाही ? **[1]**

ii) सामान्य माणूस स्वत:ला कोणाच्या भूमिकेत स्वत:ला पाहतो ? **[1]**

iii) लेखकाच्या मते, खुशीचा सौदा कधी होईल असे म्हटले आहे ? **[1]**

iv) सामान्य माणसांनी कोणती घोषणा करावी असे म्हटले आहे ? **[1]**

v) उताऱ्याला योग्य शीर्षक लिहा. **[1]**

**किंवा**

वरील उताऱ्याचा $\frac{1}{3}$ एवढा सारांश लिहा व त्याला समर्पक शीर्षक लिहा. **[5]**

ब) पुढील कविता वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :

पूर्वी कसा पाऊसकाळ
चार महिने असायचा,
हिरवंगार रान पाहून
माणूस खुशीत हसायचा.

प्रत्येकाची कणगी भरून
धान्य मोप असायचं
दुधदुभतं, तूप, लोणी
याला माप नसायचं.

पसाभरून धान्य तर
चिमणीच दारात टिपायची,
पै–पाहुण्यांसाठी माय
दिवसरात्र खपायची.

सणवार जत्रांमधून
किती जल्लोष असायचा,
भजन कीर्तन करीन गाव
आख्खी रात्र बसायचा.

एवढ्या तेवढ्या पावसावाचून
सारं चित्र पालटलंय,
गावपण हरवल्यानं
माणूसपण गारठलंय.

–कवी: शशिकांत शिंदे

**प्रश्न :**

i) पूर्वी माणूस खुशीत का असायचा ? **[1]**

ii) घरी आलेल्या पाहूण्यासाठी आई काय करायची ? **[1]**

iii) गावातील लोक सण कसे साजरे करायचे ? **[1]**

iv) कवितेला योग्य शीर्षक लिहा. **[1]**

9. अ) खालील संवाद आई व मुलगी यांच्यामधला आहे, तो तुमच्या शब्दांत पूर्ण करून लिहा : **[4]**

आई : आज गणवेश असा घाणेरडा ___________.

मुलगी : आज आम्ही शाळा ___________.

आई : तुमच्या शाळेत स्वच्छता ___________.

मुलगी : आहे ना !

आई : मग तुम्ही शाळेची स्वच्छता ___________ ?

मुलगी : कारण त्यामुळे आम्हांला ___________.

आई : बरं झालं.

मुलगी : आई हे करताना ___________.

आई : त्यात सर्व विद्यार्थ्यांनी ___________ ?

मुलगी : आम्ही सर्व विद्यार्थ्यांनी ___________.

आई : याचा तुम्हांला फायदा काय झाला ?

मुलगी : आम्हांला स्वच्छतेचे ___________.

आई : कसे काय ?

मुलगी : स्वच्छता करताना शिक्षक आम्हांला ___________.

आई : शाळेने असेच वेगवेगळे ___________.

मुलगी : होय–त्यामुळे आम्हांला त्याचे फायदे होईल.

ब) तेजस/तेजस्वी पाटील, साई नगर, फोंडा गोवा येथून आपला/आपली मित्र/मैत्रिण वृषभ/वृषाली मोरे याने/हिने तालुका पातळीवर 'दुर्गा' पूजनानिमित्य घेतलेल्या एकेरी नृत्य स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळविल्याबद्दल त्याचे/तिचे अभिनंदन करत आहे. असे समजून पत्राचा नमूना तयार करा. **[7]**

(पत्रात स्वत:च्या नावाचा उल्लेख करू नका)

**किंवा**

अनुप/अनुजा कांबळी, विद्यार्थी प्रतिनिधी, लोकमान्य टिळक विद्यालय केपे, गोवा येथून 'आजच्या काळात योगाला महत्व' हे पटवून दिल्याबद्दल योग शिक्षक श्री. गोविन्द जोशी यांचे आभार मानणारे पत्र लिहित आहे. असे समजून पत्राचा नमूना तयार करा.

(पत्रात स्वत:च्या नावाचा उल्लेख करू नका.)

10. पुढीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर **250** शब्दांपर्यंत निबंध लिहा : **[12]**

i) माझे बालपण.

ii) मी डॉक्टर झालो तर ___________

iii) फाटक्या पुस्तकाचे आत्मवृत्त

iv) नको हा कचरा ___________!